SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

गुरुवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२०

विनियम क्र. ३/२०२०

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवा मासिक पारिश्रमिकावर विवक्षित सेवा/कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचे विनियम - २०२०

ज्या अर्थी, शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेणेसंदर्भात महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ निर्गमित झालेला आहे,

आणि

ज्या अर्थी, दि.२७.३.२०१८ च्या अधिसभेमध्ये बाब क्र.२ (प्रश्न क्र.७) अन्वये सन्माननीय सदस्यांनी सदरिल दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुषंगाने विचारलेल्या प्रश्नानुषंगाने, विद्यापीठातील निवृत्त कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर शासकीय/निमशासकीय/खाजगी सेवेतून निवृत्त कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजामध्ये आवंटित करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल, असा सभागृहाने निर्णय दिला,

आणि

ज्या अर्थी, वरिल प्रयोजनार्थ मा.कुलगुरुंद्वारा गठीत समितीच्या शिफारशी त्यासोबतच्या सहपत्रांसह दि.२८.११.२०२० च्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र.९६ अन्वये मान्य केल्यात,

त्या अर्थी, वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवा मासिक पारिश्रमिकावर विवक्षित सेवा/कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात खालील प्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे;

१) या विनियमास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवा मासिक पारिश्रमिकावर विवक्षित सेवा/कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचे विनियम क्र.३/२०२० असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि.२८.११.२०२० पासून अस्तित्वात येतील.

३) व्याख्या- या विनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

अ) "विद्यापीठ" म्हणजे अमरावती विद्यापीठ कायदा, १९८३ (महाराष्ट्र) XXXVII अन्वये स्थापन झालेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

ब) "सेवानिवृत्त अधिकारि" म्हणजे महाराष्ट्र राज्यातील कृषी/अकृषी विद्यापीठे, राज्य शासनाच्या सेवेतून / निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त झालेले वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकारि.

क) "विवक्षित सेवा/कामे" म्हणजे विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभागामधील नियमित स्वरूपाची कामे वगळून विविध विषयासंदर्भात कुलगुरुंद्वारा निश्चित केलेली कालमर्यादीत विशिष्ट सेवा/कामे.

४) विद्यापीठातील प्रशासकीय विभागातील विविध विषयासंदर्भात विवक्षित सेवा/कामांसाठी विषयनिहाय Empanelment करून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेता येतील. त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे :-

अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती-

१) **नामिकासूची (पॅनल)-** करार पद्धतीने विवक्षित कामांसाठी नेमणुका करतांना पारदर्शक पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. त्याकरिता विद्यापीठाद्वारे विविध विषयांची विवक्षित कामे/सेवा यासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची यादी तयार करण्याचे दृष्टीने आवश्यकतेनुसार स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन विवक्षित कामांसाठी पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून सोबतच्या **परिशिष्ट-अ** अन्वये विहित केलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तींची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड व नियुक्तीसाठी नामिकासूची (पॅनल) कुलगुरुंना मान्यतेकरिता सादर करावी.

२) **नामिकासूची (पॅनल) ची वैधता-** मा.कुलगुरुंनी मान्यता प्रदान केलेल्या नामिकासूचीतील व्यक्तींमधूनच विवक्षित कामाकरिता करार पद्धतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी-** विवक्षित कामाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी मा.कुलगुरुंनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र-** नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारि संबंधित व्यक्तीची राहील, तसेच करार पद्धतीने नियुक्ती देतांना या संदर्भात विद्यापीठाने विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याबाबतचे **परिशिष्ट-ब** नुसार विहित केलेले बंधपत्र/हमीपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे.

५) **नियुक्ती आदेश-** नामिकासुचीतील व्यक्तींकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशामध्ये एमपॅनलमेंटचा विषय, विवक्षित स्वरूपाचे काम आणि ते पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करून कुलगुरुंचे मान्यतेने नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तींची संख्या-** करार पद्धतीने नियुक्ती देतांना कार्यालयातील/आस्थापनेवरिल वर्ग १ / वर्ग २ संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० टक्के इतके अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करतांना कामाचे स्वरूप, आकस्मिकता, विद्यार्थी हित व सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा-** सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारि नियुक्ती ही कामाची व्याप्ती अजमावून, एका कामाकरिता एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी, देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता नियंत्रण अधिकाऱ्यांच्या शिफारसीनुसार कामाचा आढावा घेऊन सक्षम प्राधिकारिणीने मुल्यमापन केल्यानंतर नुतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा-** करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा कुलगुरुंच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने विवक्षित कामाकरिता नियुक्ती देण्यात येऊ नये.

ब) अर्हता व अनुभव -

१) **विवक्षित कामासाठी लागणारि विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्वअट राहील.**

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारि यांचेकडे प्रस्तावित सेवेसाठी आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांच्याविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. यासंदर्भात विद्यापीठ आस्थापना व्यतिरिक्त इतर आस्थापनेतील आवेदनकर्त्याने विहित अर्जासोबत पूर्वीच्या नियोक्त्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारि/कर्मचाऱ्यांच्यासंदर्भात आस्थापना शाखेने विहित अर्जामध्ये कार्यालयाचे अभिप्राय नोंदवावे.

क) नियमित मंजूर पदे

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पद्धतीने करण्यात येणारि नियुक्ती ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच राहील.

२) नियमित मंजूर पदावर करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे विद्यापीठ सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

ड) मासिक पारिश्रमिक

१) **(अ) शासकीय/निमशासकीय सेवा-** सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहित कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाईभत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

(ब) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा- ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करतांना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करून त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांना उपरोक्त मासिक पारिश्रमिकाशिवाय इतर कुठलेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

३) पारिश्रमिकापोटीची मिळकत आयकर विवरणपत्रात दर्शविण्याची जबाबदारि करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांची राहील.

४) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्ती वेतन व महागाई भत्ता यांवर होणार नाही.

५) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांच्या पारिश्रमिकापोटी होणारा खर्च हा विद्यापीठीय अर्थसंकल्पीय शीर्ष- "office Expenses-Payment for Retired persons & Land affected persons or his/her heir" या शीर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

६) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारि यांना देय पारिश्रमिकाची प्रतिपूर्ती शासनाकडून होण्याकरिता वित्त विभागामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावेत व त्याचा पाठपुरावा करावा.

इ) इतर अटी व शर्ती-

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामवून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल. तसेच विद्यापीठातील नियमित अधिकारि/कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या इतर सोयी व सवलती त्यांना लागू असणार नाहीत.

२) कुलगुरुंना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरिल सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. यासंदर्भात संबंधित सेवानिवृत्त अधिकारि यांचा सेवेसंदर्भात कुठलाही उजर राहणार नाही.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील, व ते सदरिल माहिती कुणालाही अनधिकृतरित्या पुरविणार नाही.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण निष्ठेने आणि नियमानुसार पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारि वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

७) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीं करित असलेल्या कामाचे पर्यवेक्षणाची व पूर्ण केलेल्या कामाची संपूर्ण जबाबदारि संबंधित विभागातील नियंत्रण अधिकाऱ्यांची राहील.

८) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींच्या कामाच्या वेळा कार्यालयीन वेळेनुसार वा संबंधित विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे राहतील.

१०) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचेल, असे कुठलेही कृत्य करणार नाही.

११) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना सोपविलेली कामे व कामाचे स्वरूप हे संबंधित नियंत्रण अधिकाऱ्याने वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे तसेच त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे राहील.

परिशिष्ट-अ

अलिकडे काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र येथे चिटकवावे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवा मासिक पारिश्रमिकावर विवक्षित सेवा/कामांसाठी घेण्याकरिता करावयाचे आवेदनपत्र

१) जाहिरात क्र..... दिनांक .....

२) जाहिरातीत नमूद केल्यानुसार :- .....
विवक्षित कामाचा विषय

३) आवेदकाचे संपूर्ण नांव :- .....
(आडनांव प्रथम)

४) कायमचा पत्ता :- .....
.....
..... पीन कोड .....

५) पत्रव्यवहाराचा पत्ता :- .....
.....
..... पीन कोड .....

६) भ्रमणध्वनी क्रमांक :- ..... दूरध्वनी क्रमांक :- .....
इ-मेल :- .....

७) जन्मतारिख :- .....

८) आवेदनपत्र सादर करण्याचे तारखेस असलेले वय :- वर्ष ..... महिने ..... दिवस.....

९) आवेदकाची जात व प्रवर्ग :- .....

१०) सेवानिवृत्तीचा दिनांक :- .....

११) सेवानिवृत्तीचे दिवशी धारण केलेले पद :- .....
पदाचा गट :- गट-अ / गट- ब (अनावश्यक ते खोडावे)

१२) ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले :- .....
त्या कार्यालयाचे नाव व पत्ता .....

१३) मंजूर सेवानिवृत्ती वेतन :- .....
मूळ निवृत्ती वेतन (अंशराशीकृत वेतन वगळून) + महागाई भत्ता :- .....
(सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले सेवानिवृत्ती वेतन आदेशाची प्रत जोडावी.)
(ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्ती वेतनार्ह सेवा नाहीत, त्यांनी सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले मूळ वेतन नमूद करावे. त्या पृष्ठर्थ सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले वेतन प्रमाणपत्र जोडावे.)

१४) शैक्षणिक अर्हता- (शालांत परिक्षेनुसार क्रमाने)

अ. क्र.	उत्तीर्ण केलेली परिक्षा	विद्यापीठ/मंडळ	प्राप्त श्रेणी	प्राप्त गुणांची टक्केवारि	उत्तीर्ण झाल्याचे वर्ष
१					
२					
३					
४					
५					
६					
७					

टिप :- विवक्षित कामाकरिता लागणारि विशेष अर्हता असणे आवश्यक आहे.

१५) संगणक विषयक अर्हता :-

अ. क्र.	उत्तीर्ण केलेली परिक्षा	विद्यापीठ/मंडळ	प्राप्त श्रेणी	प्राप्त गुणांची टक्केवारि	उत्तीर्ण झाल्याचे वर्ष
१					
२					
३					
४					

टिप :- विवक्षित कामाकरिता लागणारि विशेष अर्हता असणे आवश्यक आहे.

१६) अनुभवाचा तपशिल :- (सेवेत रूजू झाल्यापासून कालानुक्रमे उल्लेखित करावा.)

धारण केलेले पद व विभागाचे / कार्यालयाची नांवे व पत्ता	पासून	पर्यंत	कालावधी		पे बँड व ग्रेड पे	कामाचे स्वरूप
			वर्ष	महिने		

टिप :- १) विवक्षित कामासाठी संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
२) विद्यापीठ आस्थापना व्यतिरिक्त इतर आस्थापनेतील आवेदनकर्त्याने सदर अर्जासोबत त्यांच्या नियोक्त्याचे, १) सेवानिवृत्तीचा दिनांक, २) सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद, ३) सेवाकाळात पार पाडलेल्या कामाचे स्वरूप, ४) कुठलीही जबर शिक्षा ठोठावली नसल्याचे, तसेच ५) त्यांचे विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७) इतर उपक्रम :- .....

.....

१८) काही अधिक माहिती द्यावयाची झाल्यास ती येथे लिहावी :- .....

.....

.....

प्रतिज्ञापत्र

माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे मी या अर्जात नमूद केलेली माहिती खरि असून माहिती खोटी ठरल्यास आवश्यक त्या कार्यवाहीस मी पात्र राहील.

ठिकाण :-
दिनांक :- (आवेदकाची सही)

.....

आस्थापना शाखेचा शेरा
(विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांकरिता)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु./डॉ..... हे/ह्या कार्यालयीन अभिलेखानुसार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेवेतून दि..... रोजी ..... या पदावरून सेवानिवृत्त झाले/झाल्या आहेत. त्यांनी त्यांच्या सेवाकाळात ..... या संवर्गातील कामे पार पाडलेली आहेत. त्यांचे सेवाकालावधीत त्यांचेवर जबर शिक्षा ठोठावलेली नाही/आहे.तसेच त्यांचे विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नाही/आहे. विवक्षित कामासाठी लागणारि विशेष अर्हता ते धारण करतात/ करित नाहीत. तसेच त्यांना संबंधित विवक्षित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आहे/नाही.

दिनांक :- उपकुलसचिव (आस्था.)
ठिकाण :- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

परिशिष्ट-ब

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठामध्ये वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवा मासिक पारिश्रमिकावर विवक्षित सेवा/कामांसाठी घेण्याकरिता सादर करावयाचे बंधपत्र/हमीपत्र

ज्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विनियम क्र. ३/२०२० नुसार विवक्षित सेवा/ कामांसाठी नियुक्त करावयाच्या वर्ग १ व वर्ग २ मधील सेवानिवृत्त अधिकारि यांनी नियुक्तीसंदर्भात बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे,

आणि

ज्या अर्थी, सदर विनियमातील तरतुदी अंतर्गत विद्यापीठाद्वारे जाहिरात क्र..... मला ..... या विवक्षित सेवा/कामाकरिता रू..... इतक्या मासिक पारिश्रमिकावर नियुक्तीपत्र देण्याचे प्रस्तावित आहे,

त्या अर्थी, मी श्री/श्रीमती/कु./डॉ..... विद्यापिठातील ..... या विवक्षित सेवा/कामाकरिता अस्थायी स्वरूपात रूजू होण्याकरिता खालील नमूद अटी व शर्ती मला मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र याद्वारे सादर करित आहे.

१) मी, विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करेल.

२) मला, करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामवून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल. तसेच विद्यापीठातील नियमित अधिकारि/कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या इतर सोयी व सवलती मला लागू असणार नाहीत.

३) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारि यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी माझ्या करार पद्धतीवरिल सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. यासंदर्भात माझा सदर सेवेसंदर्भात कुठलाही उजर राहणार नाही.

४) मी, विद्यापीठाने सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला राहणार नाही.

५) मला विवक्षित सेवा/कामाचे अनुषंगाने प्राप्त होणारि व निदर्शनास येणारि कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत मी गोपनियता पाळेल. व सदरिल माहिती कुणालाही अनधिकृतरित्या पुरविणार नाही.

६) माझेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण निष्ठेने आणि नियमानुसार मी पूर्ण करेल.

७) मला कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही, याची मला जाणीव आहे व ते मला मान्य आहे.

८) मी, माझ्या नियुक्तीच्या कालावधीत विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचेल, असे कुठलेही कृत्य करणार नाही.

९) माझ्या कार्यालयीन कामाच्या वेळा ह्या कार्यालयीन वेळेप्रमाणे वा संबंधित विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे राहतील, याची मला जाणीव आहे व ते मला मान्य आहे.

१०) मला सोपविलेली कामे व कामाचे स्वरूप हे संबंधित नियंत्रण अधिकाऱ्याने वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे तसेच त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे राहील. तसेच सोपविलेले काम पूर्ण निष्ठेने व कार्यालयीन नियमानुसार विहित कालमर्यादेमध्ये पूर्ण करण्याची जबाबदारि माझी राहील, याची मला जाणीव आहे व ते मला मान्य आहे.

११) मला प्राप्त होणाऱ्या मासिक पारिश्रमिकापोटीची मिळकत यथास्थिती माझ्या आयकर विवरणपत्रात दर्शविण्याची जबाबदारि माझी राहील.

ठिकाण :-

दिनांक :- (सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरि)

प्रति,

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती यांना सादर.